२०२४८

पोलीस आयुक्तालय,अमरावती
दिनांक २०.११.२०२१

## – प्रेस नोट –

दिनांक १३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे अचानक जमावाने हिंसक वळण घेउन व शहरामध्ये तोडफोड सुरु केली होती.त्यामध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होवुन जिवीत हानी होण्याची सकृत दर्शनी परिस्थिती निर्माण झालेली होती.

अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कलम–१४४ जाफौ.प्रमाणे संपुर्ण संचारबंदीचे ( कर्फ्यु ) आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

दिनांक २०.११.२०२१ रोजी पासुन दररोज सकाळी ०९.०० ते १८.०० वा.पावेतो सपुर्णपणे संचारबंदीमध्ये सुट देण्याचे आदेश पारीत केलेले आहे. तसेच संध्याकाळी १८.०० ते दुसरे दिवशी सकाळी ०९.०० वा.पावेतो संचारबंदी पुर्वीप्रमाणे कायम राहील असा आदेश निर्गमीत करण्यात आलेला आहे.परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती अन्न धान्य विभाग अमरावती नविन कॉटन मार्केट रोड व कृषी उत्पन्न बाजार समिती फळ व भाजी विभाग अमरावती,सक्करसाथ व सक्करसाथ ट्रान्सपोर्ट गल्ली येथील व्यापारी व ट्रान्सपोर्ट धारकांनी त्यांची अडचण सादर केल्याने त्यांना दिनांक २१.११.२०२१ रोजी पासुन कृषी उत्पन्न बाजार समिती अन्न धान्य विभाग अमरावती नविन कॉटन मार्केट रोड व कृषी उत्पन्न बाजार समिती फळ व भाजी विभाग जुने कॉटन मार्केट रोड, सक्करसाथ ट्रान्सपोर्ट गल्ली इतवारा येथे काम करनारे ओळखपत्र धारक माथाडी कामगार व सदर ठिकाणी आवागमण करनारे वाहनांना रात्रीचे संचारबंदीमधुन वगळण्यात येत असल्याचे तसेच सक्करसाथ येथील व्यापारी यांना त्यांचे गोडावुन मध्ये माल खाली करणे व भरणे करीता सकाळी ०५.०० ते सकाळी ०८.३० वा.पावेतो सुट देण्यात आली आहे.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन मा. डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती